Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**M**

# Paper-III
# PHILOSOPHY

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) .................................................

2. (Signature) .........................................

(Name) .................................................

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## DEC - 12313

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# PHILOSOPHY

## Paper III

## दर्शनशास्त्र

## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. "The life-world, for us who wakingly live in it, is always already there, existing in advance for us, the ground of all praxis whether theoretical or extratheoretical."
   (A) Heidegger
   (B) Merleau Ponty
   (C) Sartre
   (D) Husserl

2. Habermas characterises the social sciences as :
   (A) non-hermeneutic
   (B) hermeneutic
   (C) double hermeneutic
   (D) quasi hermeneutic

1. ''जीवन' -विश्व, ज्यामधे आपण सजगतेने जगत असतो, हे आपल्यासाठी आधीपासूनच तेथे असते, आपल्यासाठी आगाऊ अस्तित्वात असते, तात्विक अथवा न-तात्त्विक अशा सर्व कृतींचा ते आधार असते.'' हे मत यांनी मांडले.
   (A) हायडेगर
   (B) मेर्लो पोन्ती
   (C) सार्त्र
   (D) हुसेर्ल

2. हेबरमासने सामाजिक शास्त्रांत्री विशेषता अशी सांगितली आहे :
   (A) न अर्थविवरणशास्त्रीय
   (B) अर्थविवरणशास्त्रीय
   (C) दुप्पटीने अर्थविवरणशास्त्रीय
   (D) अंशतः अर्थविवरणशास्त्रीय

3. Merleau-Ponty upholds that human subjectivity is paradoxical in being both :

(A) Constituted and constituting

(B) Physical and mental

(C) Intellectual and intuitive

(D) Spatial and temporal

4. The thesis of the indeterminacy of translation was upheld by :

(A) Russell

(B) Quine

(C) Searle

(D) Dummett

5. According to Austin "I apologise" is :

(A) Descriptive Act

(B) Emotive Act

(C) Performative Act

(D) Prescriptive Act

3. मेर्लो-पोन्तीच्या मते मानवी व्यक्तिगतता ही पुढीलप्रमाणे दुहेरी स्वरूपाची असल्याने विरोधाभासात्मक असते :

(A) घडलेली आणि घडवणारी

(B) शारीरिक आणि मानसिक

(C) बौद्धिक आणि अंत:प्रज्ञात्मक

(D) अवकाशात्मक आणि कालात्मक

4. ''अनुवादाची अनिश्चितता'' हा सिद्धांत यांनी मांडला :

(A) रसेल

(B) क्वॉईन

(C) सर्ल

(D) डमेट

5. ऑस्टीनच्या मतानुसार ''मी क्षमा मागतो'' हे आहे :

(A) वर्णनात्मक कृती

(B) भावनिक कृती

(C) क्रियात्मक कृती

(D) आदेशपर कृती

6. For Davidson, reasons and actions are related through :

(A) Events

(B) Motives

(C) Causes

(D) Intensions

7. Which one of the following is *not* incomplete symbol according to Russell ?

(A) Descriptions

(B) Ordinary propernames

(C) Logical propernames

(D) Logical fictions

6. डेविडसन प्रमाणे बुद्धी आणि कृती याद्वारे संबंधित होते :

(A) घटना

(B) प्रेरणा

(C) कारण

(D) हेतु

7. रसेलच्या मते खालीलपैकी कोणते अपूर्ण संकेत **नाही** ?

(A) वर्णने

(B) व्यावहारिक विशेषनाम

(C) तार्किकीय विशेषनाम

(D) तार्किकीय कल्पिते

8. According to Strawson, the meaning of a word is :

(A) The set of things or the single thing it may correctly be used to refer to

(B) The images which imerge in our mind while uttering the word

(C) Universal

(D) The set of rules, habits, conventions for its use in referring

9. The view that experiences are characterized by their subjective givenness was upheld by :

(A) Husserl

(B) Heidegger

(C) Schultz

(D) Merleau-Ponty

8. स्ट्रॉसनच्या मते, शब्दाचा अर्थ म्हणजे :

(A) ज्याचा अचूक निर्देश करण्यासाठी याचा उपयोग करण्यात येतो असा वस्तुंचा संच किंवा वस्तू

(B) शब्दाचा उच्चार करतांना आपल्या मनात निर्माण होणारी प्रतिमा

(C) सामान्ये

(D) निर्देशनाचे कार्य होण्यामागील नियम, सवयी आणि प्रथा

9. यांच्या मते अनुभव हे त्यांच्या व्यक्तिनिष्ठ दत्तत्वाने विशेषित असतात :

(A) हुसेर्ल

(B) हायडेगर

(C) शुल्टझ

(D) मेर्लो-पोन्ती

10. Match the following and select the *correct* answer from the codes given below :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | G.W.F. Hegel | (*i*) | The Idea of Phenomenology |
| (2) | Edmund Husserl | (*ii*) | The Basic Problems of Phenomenology |
| (3) | Martin Heidegger | (*iii*) | The Phenomenology of Perception |
| (4) | Merleu-Ponty | (*iv*) | The Phenomenology of Spirit |

**Codes :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (D) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |

10. जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतांकांमधून योग्य पर्याय निवडा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | जी.डब्ल्यू.एफ. हेगेल | (*i*) | द आयडिया ऑफ फीनॉमीनॉलॉजी |
| (2) | एडमंड हुसेर्ल | (*ii*) | द बेसिक प्रॉब्लेम्स ऑफ फीनॉमीनॉलॉजी |
| (3) | मार्टिन हायडेगर | (*iii*) | द फीनॉमीनॉलॉजी ऑफ परसेप्शन |
| (4) | मेर्लो-पोन्ती | (*iv*) | द फीनॉमीनॉलॉजी ऑफ स्पिरिट |

**संकेतांक :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (D) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |

11. According to Buddhism, the Brahmavihara called *maitri* is to be practised in relation to :

(A) Friends, foes and neutral beings

(B) Friends, but not in relation to foes and neutral beings

(C) Friends and neutral beings, but not in relation to foes

(D) Foes only, not friends or neutral beings

12. *Karmayoga* of the *Gita* means performing :

(A) all actions with Yoga meditation

(B) only actions prescribed by Vedas

(C) actions without desire towards fruit

(D) actions with devotion to God

11. बौद्धमतानुसार मैत्री हा ब्रह्मविहार यांच्या संबंधात आचरणात आणावयाचा असतो :

(A) मित्र, शत्रू आणि तटस्थ व्यक्ती

(B) मित्रांच्या संबंधात, पण शत्रू व तटस्थ व्यक्तींच्या संबंधात नव्हे

(C) मित्र आणि तटस्थ व्यक्तींच्या संबंधात, पण शत्रूंच्या संबंधात नव्हे

(D) फक्त शत्रूंच्या संबंधात

12. गीतेतील कर्मयोगाचा अर्थ आहे :

(A) यौगिक ध्यानासह सर्व कर्मे करणे

(B) फक्त वेदनिहित कर्मे करणे

(C) फलेच्छाविरहित कर्मे करणे

(D) ईश्वरभक्तीने कर्मे करणे

13. According to *Trivarga* theory of *Purusarthas,* the following *Purusarthas* should be regulated by the following one :

(A) *Dharma* and *Artha* by *Kama*

(B) *Artha* and *Kama* by *Dharma*

(C) *Dharma* and *Kama* by *Artha*

(D) *Dharma*, *Artha* and *Kama* by *Moksa*

14. "...any standard of living which either through excess or defect hinders the service and contemplation of God is bad." Who upheld this ?

(A) Aristotle

(B) Plato

(C) Parmenides

(D) Epictetus

13. पुरुषार्थविषयक त्रिवर्गसिद्धांतानुसार खालील पुरुषार्थांचे नियंत्रण खालील पुरुषार्थाद्वारे केले गेले पाहिजे :

(A) धर्म आणि अर्थ यांचे, कामाद्वारे

(B) अर्थ आणि काम यांचे, धर्माद्वारे

(C) धर्म आणि काम यांचे, अर्थाद्वारे

(D) धर्म, अर्थ आणि काम यांचे, मोक्षाद्वारे

14. ''जो कोणताही जगण्याचा मानदंड त्यातील अतिरेकामुळे किंवा न्यूनतेमुळे ईश्वरसेवेत व ईश्वरचिंतनात अडथळा आणतो तो वाईट असतो'' हे मत कोणी मांडले ?

(A) ॲरिस्टॉटल

(B) प्लेटो

(C) पार्मनाइडिस

(D) एपिक्टेटस

15. Who upholds the entitlement approach to justice ?

(A) Rawls

(B) Dworkin

(C) Amartya Sen

(D) Nozick

16. Who argues against the view that freedom of speech should be curtailed only if it harms others ?

(A) Plato

(B) Marx

(C) Mill

(D) Nietzsche

17. For Aristotle, eudaimonism is :

(A) a state in accordance with virtue and wisdom

(B) an activity in accordance with virtue and wisdom

(C) a property in accordance with virtue and wisdom

(D) a tool in accordance with virtue and wisdom

15. न्यायविषयक अधिकारित्व-दृष्टिकोनाचा कोणी पुरस्कार केला ?

(A) रॉल्स

(B) ड्वॉरकिन

(C) अमर्त्य सेन

(D) नॉझिक

16. ''इतरांना इजा पोहोचवत असले तरच उच्चार स्वातंत्र्य मर्यादित केले पाहिजे'' या मताच्या विरोधात कोणी युक्तिवाद केला ?

(A) प्लेटो

(B) मार्क्स

(C) मिल

(D) नीत्शे

17. ॲरिस्टॉटलच्या मते, युडोमोनिझम म्हणजे :

(A) सद्गुण आणि शहाणपण यांच्यांशी अनुरूप अवस्था

(B) सद्गुण आणि शहाणपण यांच्यांशी अनुरूप कृती

(C) सद्गुण आणि शहाणपण यांच्यांशी अनुरूप गुणधर्म

(D) सद्गुण आणि शहाणपण यांच्यांशी अनुरूप उपकरण

18. According to utilitarians the right act is :

(A) The act that produces the greater balance of pleasure over suffering

(B) Whatever feels good

(C) That which is known by intuition

(D) any act that lessen sorrow and suffering

19. "Nothing can possibly be conceived in the world, or even out of it, which can be called good without qualification, except a good will", this view is held by :

(A) Hume

(B) Kant

(C) Bradley

(D) Mill

18. उपयुक्ततावाद्यांनुसार, योग्य कृती अशी असते :

(A) जी कृती दु:खावर सुखाचे अधिकतम संतुलन प्रस्तुत करते

(B) जे काही चांगले वाटते ते

(C) असे ते जे अंत:प्रज्ञेनी ज्ञात होते

(D) अशी कोणतीही कृती जी दु:ख आणि क्लेश कमी करते

19. ''या जगात किंवा जगाच्या पलीकडे ज्याला निरूपाधिकपणे सत् म्हणता येईल असे सत् संकल्पाशिवाय दुसरे काही नाही.'' हे यांचे मत आहे :

(A) ह्यूम

(B) कांट

(C) ब्रॅडले

(D) मिल

20. Which step is wrong in the following proof ?

(1)

(2)

(3) / $\therefore M \supset D$

(4) $M \supset \sim A$ 1, 2, H.S.

(5) $\sim A \vee D$ 3, Com.

(6) $\sim A \supset D$ 5, Impl.

(7) $M \supset D$ 4, 6, H.S.

(A) Step 4

(B) Step 5

(C) Step 6

(D) Step 7

21. The Caturyama dharma in Jainism was developed by :

(A) Rsabhadeva

(B) Vardhamana Mahavira

(C) Adinatha

(D) Parsvanatha

20. पुढील सिद्धतेतील चुकीची पायरी ओळखा :

(1) $M \supset \sim C$

(2)

(3) / $\therefore M \supset D$

(4) $M \supset \sim A$ 1, 2, लक्षितता शृंखला (H.S.)

(5) $\sim A \vee D$ 3, क्रमपरिवर्तन (Com.)

(6) $\sim A \supset D$ 5, व्यंजन व्याख्या (Impl.)

(7) $M \supset D$ 4, 6, लक्षितता शृंखला (H.S.)

(A) पायरी 4

(B) पायरी 5

(C) पायरी 6

(D) पायरी 7

21. जैन धर्मांतर्गत 'चातुर्याम धर्म' यांनी विकसित केला :

(A) ऋषभदेव

(B) वर्धमान महावीर

(C) आदिनाथ

(D) पार्श्वनाथ

22. These are considered to be the foundation of Hinduism :
    (A) The Puranas
    (B) Ramayana and Mahabharata
    (C) The Vedas
    (D) The Smrti Grantha

23. The total number of gunas in 'Sikhism' is :
    (A) 12
    (B) 5
    (C) 9
    (D) 10

24. Match the following and select the *correct* answer from the codes given below :

| **Name of Religion** | | **Spiritual Goal** | |
|---|---|---|---|
| (1) | Christianity | (*i*) | Kaivalya |
| (2) | Islam | (*ii*) | Jannat |
| (3) | Jainism | (*iii*) | Nirvan |
| (4) | Buddhism | (*iv*) | Heaven |

**Codes :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (B) | (*iv*) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*iii*) | (*i*) | (*ii*) | (*iv*) |
| (D) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |

22. ....................यांना हिंदूधर्माचे आधिष्ठान मानले जाते.
    (A) पुराणे
    (B) रामायण आणि महाभारत
    (C) वेद
    (D) स्मृतिग्रंथ

23. शीख धर्मातील गुणांची एकूण संख्या ही आहे :
    (A) 12
    (B) 5
    (C) 9
    (D) 10

24. जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतांकांमधून योग्य पर्याय निवडा :

| **धर्माचे नाव** | | **आध्यात्मिक ध्येय** | |
|---|---|---|---|
| (1) | ख्रिश्चन धर्म | (*i*) | कैवल्य |
| (2) | इस्लाम धर्म | (*ii*) | जन्नत |
| (3) | जैन धर्म | (*iii*) | निर्वाण |
| (4) | बौद्ध धर्म | (*iv*) | हेवन |

**संकेतांक :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (B) | (*iv*) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*iii*) | (*i*) | (*ii*) | (*iv*) |
| (D) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |

25. According to Christianity, evil entered into our world as a result of :

(A) Satan's fall

(B) God's desire

(C) Human emotion

(D) Disorder in creation of the world

26. Bentham regarded Utilitarian ethics as an important mean of :

(A) Improving reason

(B) Improving self

(C) Upholding social tradition and custom

(D) Social reform

27. Which kind of ethical theory is utilitarian ?

(A) Absolute

(B) Deontological

(C) Theological

(D) Teleological

25. ख्रिश्चन धर्मानुसार, याचा परिणाम म्हणून दुरिताने आपल्या जगात प्रवेश केला :

(A) सैतानाचे अध:पतन

(B) ईश्वरी इच्छा

(C) मानवी भावना

(D) जगाच्या निर्मितीमधील विकृती

26. बेंथम हा उपयुक्ततावादी नीतिशास्त्रास याचे महत्वाचे साधन म्हणून समजतो :

(A) बौद्धिक सुधारणा

(B) स्व-सुधारणा

(C) सामाजिक परंपरा आणि रूढींचे समर्थन

(D) सामाजिक पुनर्निमिती

27. उपयुक्ततावादी नीतीशास्त्रीय उपपत्ती कोणत्या प्रकारची उपपत्ती आहे :

(A) निरपेक्ष

(B) कर्तव्यवादी

(C) ईश्वरशास्त्रीय

(D) प्रयोजनवादी

28. Who upheld the view that the female is a female by virtue of a certain lack of qualities ?

(A) Aristotle

(B) Marx

(C) Engels

(D) Mill

29. According to C.L. Stevenson, ethical argument usually terminates, when :

(A) disagreement in belief terminates

(B) disagreement in attitudes terminates

(C) the whole value-system collapsed

(D) one perceive the non-natural quality of the object of disagreement

28. ''स्त्री ही तिच्यात काही गुणांचा अभाव असल्यामुळे स्त्री असते.'' हा दृष्टिकोन कोणी पुरस्कारला ?

(A) ॲरिस्टॉटल

(B) मार्क्स

(C) एंगल्स

(D) मिल

29. सी.एल. स्टिव्हंसनच्या मतानुसार, नैतिक युक्तीवाद सामान्यपणे संपतात, जेव्हा:

(A) समजुतीतील मतभेद संपतात

(B) वृत्तींतील मतभेद संपतात

(C) संपूर्ण मूल्य-व्यवस्था धराशायी होते

(D) मतभेदाच्या विषयातील न-नैसर्गीक गुणाचे जेव्हा प्रत्यक्ष होते

30. The law of contradiction is also known as :

(A) law of identity

(B) law of validity

(C) law of truth

(D) law of non-contradiction

31. Which of the following are known through description according to Russell ?

(A) Physical objects and sense data

(B) Sense data and other minds

(C) Other minds and metaphysical objects

(D) Physical objects and other minds

32. "But though all our knowledge begins with experience, it does not follow that it all arises out of experience." Who upheld this ?

(A) Berkeley

(B) Hume

(C) Kant

(D) Hegel

30. व्याघात नियम......................म्हणूनही ओळखला जातो.

(A) तादात्म्याचा नियम

(B) युक्ततेचा नियम

(C) सत्यतेचा नियम

(D) अ–व्याघाताचा नियम

31. रसेल यांच्या मते पुढीलपैकी कशाचे ज्ञान वर्णनातून होत असते ?

(A) भौतिक द्रव्य आणि इंद्रियदत्त

(B) इंद्रियदत्त आणि अन्य मने

(C) अन्य मने आणि सत्ताशास्त्रीय विषय

(D) भौतिकद्रव्य आणि अन्य मने

32. ''जरी आपल्या सर्व ज्ञानाची सुरुवात अनुभवातून होत असली तरी यातून हे निष्पन्न होत नाही की, सर्व ज्ञानाचा उगम अनुभवातून होतो.'' हे मत कोणी मांडले ?

(A) वर्कले

(B) ह्यूम

(C) कान्ट

(D) हेगेल

33. According to Nyaya, a person experiences his or her own happiness by the following types of perception :

(A) *Manasapratyaksa*

(B) *Svasamvedanapratyaksa*

(C) *Alaukikapratyaksa*

(D) *Aindriyapratyaksa*

34. One's own mental state is perceived by the following type of perception according to Buddhists :

(A) *Indriyapratyaksa*

(B) *Svasamvedanapratyaksa*

(C) *Manovijnanapratyaksa*

(D) *Yogipratyaksa*

35. According to Advaita-Vedanta the external objects that we perceive belong to the following realm of existence :

(A) Paramarthika Satta

(B) Vyavaharika Satta

(C) Pratibhasika Satta

(D) Tuccha

33. न्यायदर्शनानुसार व्यक्तीला त्याला किंवा तिला होणाऱ्या सौख्याची जाणीव खालील प्रकारच्या प्रत्यक्षाने होते :

(A) मानसप्रत्यक्ष

(B) स्वसंवेदनप्रत्यक्ष

(C) अलौकिकप्रत्यक्ष

(D) ऐंद्रियप्रत्यक्ष

34. बौद्धांच्या मते स्वत:च्या मानसिक अवस्थेचे ज्ञान खालील प्रकारच्या प्रत्यक्षज्ञानाने होते :

(A) इन्द्रियप्रत्यक्ष

(B) स्वसंवेदनप्रत्यक्ष

(C) मनोविज्ञानप्रत्यक्ष

(D) योगिप्रत्यक्ष

35. अद्वैतवेदांतानुसार आपण जे बाह्यविषय पाहतो त्यांच्या अस्तित्वाचा स्तर असतो :

(A) पारमार्थिक सत्ता

(B) व्यावहारिक सत्ता

(C) प्रातिभासिक सत्ता

(D) तुच्छ

36. The following cognition is called 'anumanapramana' by Nyaya :

(A) Perception of *Hetu*

(B) Knowledge of *Vyapti*

(C) Recollection of *Vyapti*

(D) Knowledge of *Sadhya*

37. The following number of *hetvabhasas* were accepted by Buddhists and Naiyayikas respectively :

(A) 5 and 3

(B) 3 and 5

(C) 5 and 2

(D) 2 and 6

38. The Buddhist notion of pancasila includes the following :

(A) Satya, Ahimsa, Asteya, Brahmacarya and Aparigraha

(B) Yama, Niyama, Asana, Pranayama and Pratyahara

(C) Sauca, Santosa, Tapas, svadhyaya and Isvarpranidhana

(D) Satya, Ahimsa, Asteya, Brahmacarya and suramaireya pramada sthana virati

36. न्यायदर्शनाने खालील जाणिवेला 'अनुमान प्रमाण' म्हटले आहे :

(A) हेतुप्रत्यक्ष

(B) व्याप्तिज्ञान

(C) व्याप्तिस्मरण

(D) साध्यज्ञान

37. बौद्धांनी आणि नैयायिकांनी स्वीकारलेल्या हेत्वाभासांची संख्या अनुक्रमे अशी होती :

(A) 5 आणि 3

(B) 3 आणि 5

(C) 5 आणि 2

(D) 2 आणि 6

38. बौद्धांच्या पंचशीलाच्या संकल्पनेमधे याचा अंतर्भाव होतो :

(A) सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह

(B) यम, नियम, आसन, प्राणायाम आणि प्रत्याहार

(C) शौच, संतोष, तपस्, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान

(D) सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि सुरामैरेय प्रमाद्स्थान विरति

39. The right path to liberation according to Ramanuja is :

(A) *Jnana* alone

(B) *Karma* alone

(C) *Karma* qualified by *Bhakti*

(D) *Bhakti* qualified by *jnana* and *karma*

40. In Nimbarka's philosophy the following metaphor is used for explaining the relation between Brahman and the world :

(A) Counch-shell and silver

(B) Milk and curd

(C) Soil and earthen pot

(D) Fire and its sparks

41. The criterion of 'real' according to Samkara is :

(A) Empirical verification

(B) Possession of the universal property called *satta*

(C) Causal efficacy

(D) Non-sublation

39. रामानुजांच्या मते मोक्षाकडे नेणारा योग्य मार्ग म्हणजे :

(A) फक्त ज्ञान

(B) फक्त कर्म

(C) भक्ति-विशिष्ट कर्म

(D) ज्ञान-कर्म-विशिष्ट भक्ती

40. निम्बार्कांच्या तत्त्वज्ञानात ब्रह्म आणि जगत् यांच्यातील संबंध स्पष्ट करण्यासाठी पुढील दृष्टांत वापरला जातो :

(A) शुक्ती आणि रजत

(B) दूध आणि दही

(C) माती आणि मातीचे भांडे

(D) अग्नी आणि त्याचे स्फुल्लिंग

41. शंकराचार्यांच्या मते 'सत्' चा निकष आहे :

(A) आनुभविक पडताळा

(B) सत्ता-सामान्य धारण करणे

(C) अर्थक्रियाकारित्व

(D) अबाधितत्व

42. Bheda, according to Madhvacarya, is :

(A) Phenomenally real

(B) Ultimately real

(C) Ultimately unreal

(D) Illusory

43. According to Gandhi :

(A) Truth is the means and Ahimsa is the end

(B) Ahimsa is the means and Truth is the end

(C) Ahimsa and Truth are identical

(D) There is not any relation between Ahimsa and Truth

44. Out of the two statement forms :

(1) $[(p \supset q).p] \supset q$

(2) $(p \vee q).\ p$

(A) both are tautologies

(B) (1) is a tautology and (2) is contingent

(C) (1) is a contingent and (2) is a tautology

(D) Both are contingencies

42. मध्वाचार्यांच्या मते भेद असतो :

(A) अनुभवतः सत्

(B) परमार्थतः सत्

(C) परमार्थतः असत्

(D) आभासरूप

43. गांधीजींच्यानुसार :

(A) सत्य हे साधन आहे आणि अहिंसा हे साध्य आहे

(B) अहिंसा हे साधन आहे आणि सत्य हे साध्य आहे

(C) अहिंसा आणि सत्य अभिन्न आहे

(D) अहिंसा आणि सत्य यात कोणताही संबंध नाही

44. पुढील विधानबंध :

(1) $[(p \supset q).p] \supset q$

(2) $(p \vee q).\ p$

(A) दोन्ही विधानबंध सर्वतः सत्य आहेत

(B) (1) सर्वतः सत्य आहे आणि (2) नैमित्तिकतया सत्यासत्य आहे

(C) (1) नैमित्तिकतया सत्यासत्य आहे आणि (2) सर्वतः सत्य आहे.

(D) दोन्ही विधानबंध नैमित्तिकतया सत्यासत्य आहेत.

45. Universals are contrasted with :

(A) Individuals

(B) Particulars

(C) Abstractions

(D) Appearance

46. Who upheld personal identity to be a fiction ?

(A) Locke

(B) Spinoza

(C) Berkeley

(D) Hume

47. For Kant, causation is :

(A) a synthetic apriori relation

(B) an analytic apriori relation

(C) a synthetic aposteriori relation

(D) an analytic aposteriori relation

45. सामान्ये याचेशी विरोधी आहेत :

(A) व्यक्ती

(B) विशेष

(C) अमूर्तकरण

(D) आभास

46. व्यक्तीची अभिन्नता कल्पित असल्याचे कोण म्हणतो ?

(A) लॉक

(B) स्पिनोझा

(C) बर्कले

(D) ह्यूम

47. कांटच्या मतानुसार, कारणता आहे :

(A) संश्लेषक अनुभवपूर्व संबंध

(B) विश्लेषक अनुभवपूर्व संबंध

(C) संश्लेषक अनुभवोत्तर संबंध

(D) विश्लेषक अनुभवोत्तर संबंध

48. The relation between *prama* and *pramana* according to Nyaya is as follows :

(A) *Prama* is a means to *pramana*

(B) *Pramana* is a means to *prama*

(C) *Prama* is the same as *pramana*

(D) *Prama* and *paramana* are two aspects of knowledge

49. Prabhakara-mimamsakas accept all the pramanas accepted by Bhattamimamsakas except :

(A) *Anupalabdhi*

(B) *Arthapatti*

(C) *Smrti*

(D) *Upamana*

50. When in illusian one experiences snake in place of rope, the status of snake according to Prabhakara mimamsakas is such that the snake at that time is :

(A) Recollected

(B) Truly perceived

(C) Perceived in a wrong place

(D) Imaginary

48. प्रमा आणि प्रमाण यांच्यातील संबंध न्यायदर्शनानुसार असा असतो :

(A) प्रमा हे प्रमाणाचे साधन आहे

(B) प्रमाण हे प्रमेचे साधन आहे

(C) प्रमा आणि प्रमाण या गोष्टी एकच आहेत

(D) प्रमा आणि प्रमाण हे ज्ञानाचे दोन पैलू आहेत

49. खालील प्रमाण वगळता प्रभाकर-मीमांसक हे भट्टमीमांसकांनी स्वीकारलेली सर्व प्रमाणे स्वीकारतात :

(A) अनुपलब्धि

(B) अर्थापत्ति

(C) स्मृति

(D) उपमान

50. भ्रमाच्या वेळी जेव्हा एखाद्याला रज्जूच्या जागी सर्प भासतो, तेव्हा प्राभाकर मीमांसकांच्या मते सर्पाचा दर्जा असा असतो की त्यावेळी सर्प :

(A) आठवला जात असतो

(B) यथार्थपणे पाहिला जात असतो

(C) चुकीच्या जागी पाहिला जात असतो

(D) काल्पनिक असतो

51. According to Anvitabhidhanavada :

(A) Sentence meaning has primacy over word meaning

(B) Word meaning has primary over sentence meaning

(C) Both word meaning and sentence meaning are equally important, but separate

(D) Both word meaning and sentence meaning are equally important, but interconnected

52. Akanksa, Yogyata and Sannidhi are understood in Indian philosophy of language as :

(A) Conditions of truth of a sentence

(B) Types of relationship among speakers

(C) Constituents of sentence meaning

(D) Constitutive conditions of a meaningful sentence

51. अन्विताभिधानवादानुसार :

(A) वाक्यार्थ हा शब्दार्थापेक्षा अग्रस्थानी असतो

(B) शब्दार्थ हा वाक्यार्थापेक्षा अग्रस्थानी असतो

(C) शब्दार्थ व वाक्यार्थ दोन्ही सारखेच महत्वाचे असतात, पण सुटे सुटे असतात.

(D) शब्दार्थ व वाक्यार्थ दोन्ही सारखेच महत्वाचे असतात, पण परस्परसंबद्ध असतात.

52. भारतीय भाषा तत्वज्ञानात आकांक्षा, योग्यता आणि संनिधि यांना समजले जाते :

(A) वाक्याच्या सत्यतेच्या अटी

(B) वक्त्यांमधील परस्परसंबंधाचे प्रकार

(C) वाक्यार्थाचे घटक

(D) अथपूर्ण वाक्याच्या स्वरूपाधायक अटी

53. The following statement is true about the Vaisesika notion of *dravyas* :
    (A) *Dravya* is of two kinds : *nitya* and *anitya*
    (B) All *dravyas* are *nitya*
    (C) All *dravyas* are *anitya*
    (D) Every *dravya* is *nitya* or *anitya* subject to the perspective of the knower

54. The following darsanas have given Akasa the status of an independent positive substance :
    (A) Vaisesika and Buddhism
    (B) Vaisesika and Sankhya
    (C) Sankhya and Jainism
    (D) Vaisesika and Jainism

55. This is *not* true of Maya :
    (A) It is *Sadasadanirvachaniya*
    (B) It is Adhyasa
    (C) It is Abhavarupa
    (D) It is vivarta

56. The following type of padartha cannot have *samavayi-karana*
    (A) Dravya
    (B) Guna
    (C) Karma
    (D) Samanya

53. वैशेषिकांच्या द्रव्य संकल्पनेबाबत पुढील विधान सत्य आहे :
    (A) द्रव्ये दोन प्रकारची असतात : नित्य आणि अनित्य
    (B) सर्व द्रव्ये नित्य असतात
    (C) सर्व द्रव्ये अनित्य असतात
    (D) ज्ञात्याच्या दृष्टिकोनानुसार प्रत्येक द्रव्य नित्य अथवा अनित्य असते

54. या दर्शनांनी आकाशास स्वतंत्र भावरूप द्रव्याचा दर्जा दिलेला आहे :
    (A) वैशेषिक आणि बौद्ध
    (B) वैशेषिक आणि सांख्य
    (C) सांख्य आणि जैन
    (D) वैशेषिक आणि जैन

55. मायेच्या बाबतीत हे सत्य **नाही** :
    (A) ती सदसद्अनिर्वचनीय आहे
    (B) ती अध्यास आहे
    (C) ती अभावरूप आहे
    (D) ती विवर्त आहे

56. पुढील प्रकारच्या पदार्थास **समवायीकारण** असू शकत नाही :
    (A) द्रव्य
    (B) गुण
    (C) कर्म
    (D) सामान्य

57. Samavaya Samvandha is seen in the following example :
   (A) Pearls and string
   (B) Flowers and their heap
   (C) Matchsticks and the matchbox
   (D) Leaves of a tree and the tree

58. Who linked substance with permanence through changes ?
   (A) Locke
   (B) Kant
   (C) Berkeley
   (D) Hume

59. Match the following and select the *correct* answer from the codes given below :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | Leibniz | (*i*) | Tabula Rasa |
| (2) | Spinoza | (*ii*) | Method of Doubt |
| (3) | Locke | (*iii*) | Windowless monads |
| (4) | Descartes | (*iv*) | Mind and matter as attributes |

**Codes :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (B) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (D) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |

57. या उदाहरणात समवाय संबंध दिसतो :
   (A) मोती आणि दोरा
   (B) फुले आणि त्यांचा ढीग
   (C) आगकाड्या आणि काडेपेटी
   (D) झाडाची पाने आणि झाड

58. द्रव्याचा बदलांमधून नित्यतेशी दुवा कोणी जुळवला ?
   (A) लॉक
   (B) कांट
   (C) बर्कले
   (D) ह्यूम

59. जोड्या जुळवा आणि दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | लायब्निझ | (*i*) | कोरी पाटी |
| (2) | स्पिनोझा | (*ii*) | संशयाची पद्धती |
| (3) | लॉक | (*iii*) | गवाक्षरहित चिदणू |
| (4) | देकार्त | (*iv*) | चित्त आणि जडतत्व गुण या स्वरूपात |

**संकेतांक :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (B) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (D) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |

60. According to Berkeley, the material world as an object of perception is to be :

(A) Represented

(B) Doubted

(C) Rejected

(D) Justified

61. "Truth *happens* to an Idea." This was upheld by :

(A) Bradley

(B) Russell

(C) Tarski

(D) James

62. According to Descartes, knowledge is to be built on strong :

(A) Belief

(B) Experience

(C) Impression

(D) Foundation

60. बर्कलेच्या मते प्रत्यक्षज्ञानाचा विषय म्हणून भौतिक जग :

(A) प्रतिनिहित केले पाहिजे

(B) संशयास्पद मानले पाहिजे

(C) नाकारले पाहिजे

(D) समर्थित केले पाहिजे

61. ''कल्पनेच्या बाबतीत सत्य घडते.'' हे मत ......................यांनी मांडले आहे.

(A) ब्रॅडले

(B) रसेल

(C) टार्स्की

(D) जेम्स

62. देकार्तच्या मते ज्ञान हे उभारले पाहिजे भक्कम :

(A) मतावर

(B) अनुभवावर

(C) ठसांवर

(D) पायावर

63. Four *varnas* and their professions (in any order) are given in columns 1 and 2. Match the pairs :

| | **Column I** | | **Column II** |
|---|---|---|---|
| (1) | *Brahmana* | (*i*) | Service to other *Varnas* |
| (2) | *Ksatriya* | (*ii*) | Warriorship and protection |
| (3) | *Vaisya* | (*iii*) | Teaching Vedas and Priesthood |
| (4) | *Sudra* | (*iv*) | Agriculture and Commerce |

**Codes :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) | (*i*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |

64. If a deductive argument is valid and all its premises are true, then the argument is :

(A) Rational

(B) Sound

(C) Empirical

(D) Philosophical

63. चार वर्ण आणि त्यांचे व्यवसाय (कोणत्याही क्रमाने) खाली स्तंभ 1 व 2 च्या खाली दिले आहेत. जोड्या जुळवा :

| | **स्तंभ 1** | | **स्तंभ 2** |
|---|---|---|---|
| (1) | ब्राह्मण | (*i*) | इतर वर्णांची सेवा |
| (2) | क्षत्रिय | (*ii*) | युद्धात भाग घेणे आणि संरक्षण |
| (3) | वैश्य | (*iii*) | वेदाध्यापन आणि पौरोहित्य |
| (4) | शूद्र | (*iv*) | शेती आणि व्यापार |

**संकेतांक :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) | (*i*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |

64. जर नैगमनिक युक्तिवाद युक्त असेल आणि त्याची सर्व आधारविधाने सत्य असतील तर तो युक्तिवाद ............................असतो.

(A) बुद्धिनिष्ठ

(B) समुचित

(C) अनुभवाधारित

(D) तात्त्विक

65. The contrary of 'E' proposition is :
(A) 'I' proposition
(B) 'O' proposition
(C) 'A' proposition
(D) Both 'I' and 'O' propositions

66. An immediate inference is an inference drawn :
(A) from only one premise
(B) from only two premises
(C) from more than two premises
(D) without any premise

67. Match the following and select the *correct* answer from the codes given below :

| **Kinds of Propositions** | **Criterion of Classification** |
|---|---|
| (1) Categorial and conditional | (*i*) quality |
| (2) Affirmative and negative | (*ii*) quantity |
| (3) Universal and particular | (*iii*) relation |

**Codes :**

| | (1) | (2) | (3) |
|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*ii*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iii*) | (*i*) | (*ii*) |

65. 'E' विधानाचे विरोधी विधान :
(A) 'I' विधान असते
(B) 'O' विधान असते
(C) 'A' विधान असते
(D) 'I' आणि 'O' ही दोन्ही विधान असतात.

66. अव्यवहित अनुमान म्हणजे ज्यात.................. निष्कर्ष काढलेला असतो.
(A) फक्त एका आधारविधानातून
(B) फक्त दोन आधारविधानांतून
(C) दोनापेक्षा जास्त आधारविधानांतून
(D) आधारविधानांशिवाय

67. जोड्या जुळवा आणि दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

| **विधानांचे प्रकार** | **वर्गीकरणाचा निकष** |
|---|---|
| (1) निरूपाधिक आणि सोपाधिक | (*i*) गुण |
| (2) होकारार्थी आणि नकारार्थी | (*ii*) परिमाण |
| (3) सर्ववाची आणि विशेषवाची | (*iii*) संबंध |

**संकेतांक :**

| | (1) | (2) | (3) |
|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*ii*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iii*) | (*i*) | (*ii*) |

68. An axiomatic system is complete in its widest sense when :

(A) all the axioms are self-evident

(B) both '$p$' and '$\sim p$' are not the theorems of the system

(C) either '$p$' or '$\sim p$' must be the theorem of that system

(D) every wff is either an axiom or a theorem of that system

69. In propositional logic, when one statement is said to be equivalent to another, it means that these statements have the same :

(A) Grammatical form

(B) Meaning

(C) Truth values

(D) Connectives

68. बीजानुमान प्रणाली व्यापकतम अर्थाने तेव्हाच संपूर्ण असते जेव्हा :

(A) सर्व मूलाधार स्वयंसिद्ध असतात.

(B) त्या प्रणालीचे '$p$' आणि '$\sim p$' हे दोन्ही प्रमेये नसतात.

(C) त्या प्रणालीचे '$p$' किंवा '$\sim p$' यापैकी एक प्रमेय असलेच पाहिजे

(D) प्रत्येक सुघटितसूत्र त्या प्रणालीचा एकतर मूलाधार असला पाहिजे किंवा प्रमेय असले पाहिजे

69. विधान तर्कशास्त्रात, एक विधान दुसऱ्या विधानाशी सममूल्य आहे असे म्हटले जाते, तेव्हा त्याचा अर्थ या दोन्ही विधानांत समान..........

(A) व्याकरणीय आकार असतो

(B) अर्थ असतो

(C) सत्यता मूल्ये असतात

(D) तर्ककारके असतात

70. Which of the following is the *correct* symbolization of the following argument ?

"Some internet sites do not provide information. Something provides information and knowledge. Therefore no internet site provides knowledge."

(Sx–x is an internet site; Ix–x Provides information; Kx – x provides knowledge)

(A)

$(\exists x)\ (Ix\ .\ Kx)$

$/ \therefore (x)$

(B) $(\exists x)\ (Sx\ .\ \sim Ix)$

$(\exists x)\ (Ix\ .\ Kx)$

$/ \therefore$

(C) $(\exists x)\ (Sx\ .\ \sim Ix)$

$(\exists x)\ (Ix\ .\ Kx)$

$/ \therefore$

(D) $(\exists x)\ (Sx\ .\ \sim Ix)$

$(\exists x)\ (Ix\ .\ Kx)$

$/ \therefore$

71. According to Vallabha, out of the three essential characteristics of *Isvara*, viz. *sat, cit* and *ananda,* the following is/are vividly present in the world :

(A) only *sat*

(B) only *cit*

(C) *sat* and *cit* only

(D) all of the above

70. पुढील युक्तिवादाचे खाली दिलेल्या चिह्नांकनांपैकी कोणते बरोबर आहे ?

"काही इंटरनेट साईट्स माहिति पुरवत नाहीत. काही गोष्टी माहिति आणि ज्ञान पुरवतात. म्हणून एकही इंटरनेट साईट ज्ञान पुरवत नाही.

(Sx–x ही इंटरनेट साईट आहे. Ix–x माहिती पुरवते, Kx – x ज्ञान पुरवते.

(A) $(\exists x)\ (Sx\ .\ \sim Ix)$

$(\exists x)\ (Ix\ .\ Kx)$

$/ \therefore (x)$

(B) $(\exists x)\ (Sx\ .\ \sim Ix)$

$(\exists x)\ (Ix\ .\ Kx)$

$/ \therefore$

(C) $(\exists x)\ (Sx\ .\ \sim Ix)$

$(\exists x)\ (Ix\ .\ Kx)$

$/ \therefore$

(D) $(\exists x)\ (Sx\ .\ \sim Ix)$

$(\exists x)\ (Ix\ .\ Kx)$

$/ \therefore$

71. वल्लभाचार्यांच्या मते सत्, चित् आणि आनंद या ईश्वराच्या तीन मूलभूत धर्मांपैकी पुढील धर्म जगात स्पष्टपणे उपस्थित असतो/असतात :

(A) फक्त सत्

(B) फक्त चित्

(C) फक्त सत् आणि चित्

(D) वरील तीनही

72. Quit India Call given by Gandhi was an example of this kind of Satyagraha :
   (A) Disobedience
   (B) Direct action
   (C) Non-co-operation
   (D) Fasting

73. From the two views (*i*) Truth is God and (*ii*) God is Truth, Gandhi held :
   (A) Both simultaneously
   (B) (*i*) earlier and (*ii*) later
   (C) (*ii*) earlier and (*i*) later
   (D) none of the above

74. Gandhi's idea of the ideal state is the idea of the :
   (A) Centralised Republic
   (B) Urban Republic
   (C) Elite Republic
   (D) Village Republic

75. Gandhi says, "I consider untouchability to be a heinous crime against............".
   (A) nation
   (B) humanity
   (C) society
   (D) lower caste

72. भारत छोड़ो ही गांधीजींनी दिलेली हाक, या प्रकारच्या सत्याग्रहाचे उदाहरण आहे :
   (A) अवज्ञा
   (B) प्रत्यक्ष कृती
   (C) असहकार
   (D) उपोषण

73. (*i*) सत्य ईश्वर आहे आणि (*ii*) ईश्वर सत्य आहे या दोन दृष्टिकोनांपैकी गांधीजींनी :
   (A) दोन्ही दृष्टिकोन एकाच वेळी स्वीकारले
   (B) (*i*) हा आधी व (*ii*) हा नंतर स्वीकारला
   (C) (*ii*) हा आधी व (*i*) हा नंतर स्वीकारला
   (D) कोणताच स्वीकारला नाही

74. गांधीजींची आदर्श राज्याची कल्पना ही याची कल्पना आहे :
   (A) केंद्रीकृत प्रजासत्ताक
   (B) नागरी प्रजासत्ताक
   (C) उमराव प्रजासत्ताक
   (D) ग्रामीण प्रजासत्ताक

75. गांधीजी म्हणत, ''मी अस्पृश्यतेस................ च्या विरोधातील जघन्य अपराध मानतो:
   (A) राष्ट्र
   (B) मानवता
   (C) समाज
   (D) कनिष्ठ जात

ROUGH WORK